# कर्मवीर भाऊराव पाटील यांचे सामाजिक शैक्षणिक कार्य

**यमुना चंद्रकांत ढेंबरे**
संशोधक विद्यार्थिनी (पीएचडी.)
जालना समाजकार्य महाविदयलय, जालना.
dhyamuna@gmail.com

**प्रस्तावना:**

कर्मवीर भाऊराव पाटील (जन्म 22 सप्टेंबर 1887- मृत्यू 9 मे 1959) हे महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षण तज्ञ होते. भाऊराव पाटील हे सामूहिक शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. "कमवा आणि शिका" या तत्त्वज्ञानाची सुरुवात करून त्यांनी मागास जाती आणि अत्यल्प उत्पन्न असलेल्या लोकांना शिक्षित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे ते सदस्य होते. त्यांचे मूळ गाव कूंभोज  हे होते. त्यांना सण 1959 मध्ये पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे कार्य म्हणजे समाजामध्ये सुधारणा घडून आणण्याचे कार्य आणि शिक्षण प्रसार.. भाऊराव पाटील हे जैन होते मात्र जनतेमध्ये एवढे मिसळून गेले की बहुजन समाजाला ते आपले वाटत असत. भाऊराव पाटलांचे व्यक्तिमत्व महान होते. जातीभेदाच्या पलीकडे त्यांचे विचार व्यक्तिमत्व होते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यात होता.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण प्रसारासाठी दिले. महाराष्ट्रामध्ये शिक्षण क्षेत्रात त्यांचे प्रेरणादायी शिक्षणयात्री अशी त्यांची ओळख आहे. महाराष्ट्रातील जनतेने त्यांना कर्मवीर म्हणजे कृतींचा राजा ही उपाधी देऊन सन्मानित केले. भारत सरकारने त्यांना 1959 मध्ये पद्मभूषण हा भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन आणि 1988 मध्ये त्यांच्या समानार्थ टपाल तिकीट प्रकाशित करून भाऊराव पाटील यांचा सन्मान केला.

**सामाजिक व शैक्षणिक कार्य:**

बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करताना विद्यार्थ्यांमध्ये बंधूता व समता रुजावी यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणातून समता व बंधुता यांचे संस्कार विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी

चालवलेल्या वस्तीगृहात विविध जाती धर्माचे विद्यार्थी एकत्र राहत असत .ते सर्वजण स्वतःच्या हाताने सामुदायिक रित्या स्वयंपाक करत आणि एकत्रच जेवण करत. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव होता.त्यांच्या कार्यावर शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव होता. कर्मवीर लहानपणापासून बेडर वृत्तीचे होते. ते पोहोण्याच्या कामात निपून होते.

कर्मवीरांच्या गावी कुंभोज मध्ये सत्याआपा बंड हे प्रकरण खूप गाजली होते. कुंपणाच्या काट्या तोडणाऱ्या एका दलित गरोदर बाईला एका माणसाने जनावरासारखे मारले. सत्यपाा भोसले ला त्याचा सात्विक संताप आला. रागाच्या भरात त्याने त्या माणसाला ठार केले .व तो फरार झाला. तो कर्मवीरांना च्या आजोबांच्या उसाच्या फडा त लपून बसला.

बंडखोरी ,अन्यायाविरुद्ध चीड हे सद्गुण सत्यपाकडून कर्मवीरांना मिळाले. त्यांच्या बालपणी सार्वजनिक ठिकाणी पाणी भरता येत नसे पाण्यासाठी तासान तास विनवणी करावी लागे. हे भविष्य काळाचे राजे होते. त्यांनी महाराष्ट्रात समतेचा झेंडा लावला.

1932 मध्ये महात्मा गांधी व बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये पुणे करार झाला. या ऐक्याच्या स्मरणार्थ" युनियन बोर्डिंग" ची स्थापना भाऊरावांनी पुणे येथे केली. हे एक व्हावे याविषयीची तळमळ महर्षी शिंदे आणि भाऊराव पाटील यांना होती.

प्रथकता वादाने दलितांचे प्रश्न सुटणार नाहीत तर ते वाढतील. असे त्यांचे मत होते. 1935 मध्ये "महात्मा फुले अध्यापक विद्यालय" त्यांनी सुरू केले. यामागे त्यांचा उद्देश शिक्षणाची चळवळ ग्रामीण भागापर्यंत पोहोचवणे. त्यासाठी योग्य शिक्षक घडवणे हे होते .

दिनांक 4 ऑक्टोबर इसवी सन 1919 रोजी भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना सातारा जिल्ह्यातील "काले "या गावी केली. डॉक्टर नागनाथ अण्णा नायकवाडी यांनी रयत शिक्षण संस्थेला 1 11 111 रुपयांची देणगी दिली. पुढे या संस्थेचे मुख्यालय सातारा येथे नेण्यात आले

**. या संस्थेची काही उद्दिष्टे खालील प्रमाणे :**

1)शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गात शिक्षणाची आवड निर्माण करणे व ती वाढवणे. 2)मागासलेल्या वर्गातील गरीब मुलांना मोफत शिक्षण देणे. 3)निरनिराळ्या जाती धर्मातील विद्यार्थ्यांत प्रेम भाव निर्माण करणे.

4) आयोग्य जोडींना फाटा देऊन खऱ्या विकासाची वळण लावणे.

5) संबंध संघर्ष शक्तीचे महत्त्व जरूर तर कृतीने पटवून देणे. सर्व मुले काटकसरी, स्वावलंबी, शीलवान व उत्साही बनवण्याचा प्रयत्न करणे.

6) बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसारसाठी जरूर पडेल तसे संस्थेचे कार्यक्षेत्र वाढवणे.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी भाऊरावांनी केवळ क्रमिक शिक्षणच नव्हे तर समता, बंधुता श्रम प्रतिष्ठा ,सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची शिकवण विद्यार्थ्यांना दिली.

सातान्यात भाऊरावांनी एक मोठे वस्तीगृह स्थापन केले व हे वसतिगृह चालवण्यासाठी त्यांच्या पत्नीस स्वतःचे मंगळसूत्र व दागिने ही विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी वस्तीगृहे व शिक्षण संस्था चालविण्याचा यशस्वी प्रयोग केला. इसवी सन 1922 रोजी महात्मा गांधींच्या हस्ते या वस्तीग्रहाचे "श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस" असे नामकरण केले गेले. महात्मा गांधी यांनी हरिजन सेवक फंडातून वार्षिक पाचशे रुपयांची मदत सुरू केली. जून 16 इसवी सन 1935 रोजी रयत शिक्षण संस्था नोंदणीकृत(रजिस्टर) झाले. याच वर्षी भाऊराव यांनी सातारा येथे "सिल्वर जुबली ट्रेनिंग कॉलेज" सुरू केले. बडोद्याच्या सयाजीराव महाराजांनी भाऊराव पाटलांना सातान्यात हायस्कूल काढण्यासाठी 4000 रुपये दिले. व बडोद्यात महाराजांच्या राज्य रोहनास 60 वर्ष झाल्या निमित्त होणान्या समारंभाचे आमंत्रण दिले.

मिळालेल्या देणगीतून भाऊरावांनी देशातले "कमवा व शिका "या पद्धतीने चालणारे पहिले "फ्री अँड रेसिडेन्सीअल हायस्कूल" सातारा येथे सुरू केले. आणि त्याला नाव दिले "महाराजा सयाजीराव हायस्कूल". इसवी सन 1947 साल भाऊराव यांनी सातान्यात "छत्रपती शिवाजी कॉलेज" सुरू केले. इसवी सन 1954 साल कराड येथे "सद्गुरु गाडगे महाराज" कॉलेजची स्थापना केली. यानंतर शाळा व महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित शिक्षकांची उणीव जाणवू लागली. म्हणून त्यांनी प्रथम महात्मा फुले अध्यापक विद्यालय व पुढे इसवी सन 1955 मध्ये सातारा येथे मौलाना आझाद यांच्या नावाने" आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन" सुरू केले. सर्व शाळांच्या, महाविद्यालयांच्या, वस्तीग्रहांच्या स्थापने मागे शिक्षणाचा प्रसार व त्यातून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हीच उद्दिष्टे भाऊरावांच्या डोळ्यासमोर होती.

महात्मा फुले यांना गुरू मानूनच त्यांनी शैक्षणिक प्रसाराचे कार्य केले. रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था आहे. महाराष्ट्र व कर्नाटक मिळून 675 शाखा आहेत. त्यामध्ये 20 पूर्व प्राथमिक, 27 प्राथमिक, 438 माध्यमिक, अध्यापक विद्यालय, 2 आयटीआय व ४१

महाविद्यालयांचा समावेश आहे. भाऊराव हे समाज सुधारक व शिक्षण प्रसारक होते. सर्वसामान्य जनतेपर्यंत शिक्षणाची दारे घेऊन जाण्यासाठी त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.

**संदर्भ:**

1) चव्हाण रा. ना.(2012) ग्रामीण महाराष्ट्राचे शिक्षण परंपरा, पुणे. राणा चव्हाण प्रतिष्ठान.

2) चव्हाण, रा.ना.(2012) ग्रामीण महाराष्ट्राचे शिक्षण परंपरा .पुणे: रा.ना. चव्हाण प्रतिष्ठान..

3) सातारा जिल्ह्याचे संकेतस्थळ-" प्रभावशाली व्यक्ती"( इंग्लिश भाषेत) मूळ पान पासून संग्रहित ...

4)जोहरापूरकर ,अमित (2023) चरित्र पहा.

5) विकिपीडिया 2025 -1-5 रोजी पाहिले.